# विचित्र पावले

**गुरुनाथ नाईक**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

B251

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**विचित्र पावले : गुरुनाथ नाईक**

**© गुरुनाथ नाईक**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंती प्रिंटरी

**आवृत्ती**
२९ ऑगस्ट, २०१३

**किंमत**
रुपये २३०/-

## अनुक्रमणिका

विचित्र पावले / ५
खुनी साक्षीदार / ९७
दरोडेखोरांचे बंड / १६३

# विचित्र पावले

## १

नंदिनी महाजन ही मीरपूर कँपमधील एक चर्चेचा विषय होऊन बसली होती. बेफाम तरुणी म्हणून तिला ओळखले जात होते.

कर्नल बहादूरसिंग महाजन यांची ती पोरगी. अतिशय लाडावलेली किंवा लाडावून ठेवलेली. एकुलती एकच असल्यामुळे कौतुकाला कमतरता नव्हती. बापाचा महिन्याचा पॉकेटखर्च तिच्या हातात पडला तर ती दिवसात उडवून मोकळी व्हायची.

बायकी थाटाच्या, गालापर्यंत कल्ले वाढवलेल्या पोरांबरोबर ती फिरायची. कर्नलसाहेबांना ते काही आवडायचे नाही. कधी कधी ते रागाच्या भरात बोलायचे आणि मग ती रुसून बसायची. तिची समजूत घालता घालता आई-बापांची त्रेधा उडायची.

कर्नलसाहेब तिच्या आईला म्हणायचे, तुझ्या लाडाने पोरगी बिघडली. तर आई म्हणायची... तुमचेच लाड भोवताहेत... एकुलती एक म्हणून रीतीबाहेर नाचवलीत... आता बोलता कशाला?

घरात हे असे चालायचे.

एकंदरीत काय, लोकांच्या मते पोरगी हाताबाहेर गेली होती. कर्नलसाहेबांना वाटायचे, पोरवय आहे. एक दिवस येईल ताळ्यावर.

'बावीस वर्षांची घोडी झाली, आता कसली वाट पाहता ती ताळ्यावर यायची. ऑफिसात रिंगमास्टरसारखे वागता... पोरीला का नाही शिस्त लावीत?' आई म्हणायची. बिचारे कर्नलसाहेब...

इतरांपुढे वाघ... बायकोपुढे शेळी!

एक दिवस संध्याकाळी पाच वाजता ती स्कूटर घेऊन शहरातील आपल्या एका मैत्रिणीकडे गेली. अशी कधी मैत्रिणीकडे गेली आणि रात्री दहापर्यंत आली नाही तरी तिच्या घरात कुणाला त्याबद्दल आश्चर्य वाटत नव्हते.

कधीकधी ती रात्री बारा साडेबारालासुद्धा आली होती. हट्टी पोरीला कोणत्या भाषेत ते समजावणार होते?

तो शनिवार होता. दहा वाजले तरी पोरगा आली नाही. अकरा वाजले, बारा वाजले... एक वाजला.

'अहो, पोर आली नाही अजून!' आई काळजीच्या सुरात म्हणाली.

'मग मी काय करू? मी काही तिला शोधायला जाणार नाही.' कर्नलसाहेब ठाम सुरात म्हणाले, पण तेही काळजीत पडले होते. जाडजूड पुस्तक त्यांनी वाचायला घेतले होते आणि दोन तासात दोनच पाने उलटली होती. दहा वाजताच झोपणारे कर्नल एक वाजला तरी जागे होते.

'पावणेदोन वाजले!' आई पुटपुटली.

'हं!' ते फक्त हुंकारले.

'इतका उशीर तिनं कधीच केला नव्हता.'

'कधीतरी करील याची मला खात्री होती.' ते शांतपणे म्हणाले आणि त्यांची पत्नी चिडली.

'तुम्हाला जरातरी काळजी वाटायला हवी होती.'

'डार्लिंग, तिची काळजी करीत बसलो तर मला नोकरी सोडून घरीच बसावं लागेल.' ते मानभावीपणे म्हणाले... त्यांच्या चेष्टेच्या सुरात काळजीची झाक होती. अडीच वाजले आणि एकाएकी कर्नलसाहेब उठले. कपडे करता करता त्यानी ऑर्डर्लीची बेल दाबली. त्यानी कपडे केले तेव्हा ऑर्डर्ली हजर झाला होता. केवळ दोन मिनिटात ते तयार झाले.

'गाडी काढ.' ते कठोर सुरात बोलले. त्यांचा ऑर्डर्ली चांगला ड्रायव्हर होता. वृत्तीने बेडर होता म्हणूनच त्याना अतिशय आवडत होता.

सेंट्रीला सूचना देऊन ते दारात आलेल्या अँबेसेडरमध्ये बसले.

'साब, कहाँ?'



'शहरमें.' साहेब उद्‌गारले.

गाडी सुसाटत बाहेर पडली. फाटकातील सेंट्रीच्या सलामीकडे कर्नल-साहेबांचे बिलकूल लक्ष नव्हते.

'पंडतके बंगलेपर' शहरात गाडी शिरताच कर्नलसाहेब बोलले. यापुढे पोरीला धारेवर धरलेच पाहिजे, असा त्यांनी पक्का निश्चय केला होता मनाशी.

आजपर्यंत दिली ती सवलत फार झाली होती. असेच चालले तर एक दिवस आपल्याला पोरगी गमवावी लागेल, असे त्यांना वाटत होते. सहजासहजी पोरगी गमवायची त्यांची तयारी नव्हती.

पंडतच्या बंगल्याचे फाटक बंद होते. चार वेळा हॉर्न वाजवताच त्यांचा नोकर डोळे चोळीत बाहेर आला आणि बाहेर मोटार पाहून त्याने घाईघाईने फाटक खोलले.

गाडी पोर्चमध्ये थांबली.

'नंदिनी आली होती?' बाहेर येत कर्नलसाहेबांनी त्या नोकराला विचारले.

'आल्या होत्या साहेब... पण आठ वाजताच घरी गेल्या. ताईसाहेब जेवायला राह्यचा फार आग्रह करीत होत्या... पण थांबल्याच नाहीत.'

'जा... अंजलीला उठव.' ते कडाडले आणि नोकराने दाराची बेल दाबली... आतल्या गड्याने दार उघडले. दिवाणखान्यातला दिवा लावण्यात आला.

दोनच मिनिटांनी अंजली... नंदिनीची मैत्रीण बाहेर आली... ती कर्नलांकडे पाहून हसत होती.

'अंकल? इतक्या रात्री?'

'नंदिनी इथून किती वाजता गेली?' ते कठोर आवाजात म्हणाले आणि अंजलीचा चेहरा खर्रकन उतरला. काहीतरी गडबड आहे हे तिच्या लक्षात आले; पण काय ते समजणे शक्य नव्हते.

'आठ वाजता. काय झालं अंकल?' अंजलीच्या सुरात काळजी भरली होती.

'ती घरी आली नाही.' कर्नलसाहेबांनी नजर शून्यात रोखली गेली होती. 'अंजू ती आणखी कुठे जाणार असे म्हणाली होती.?'

'नाही... घरी जायला हवं म्हणाली. मी जेवायचा आग्रह केला तरी थांबली नाही.

'तिच्या आणखी कुणी मैत्रिणी आहेत शहरात?'

'हो... दोघी आहेत.'

'चल... ताबडतोब कपडे कर... तिथं जाऊन येऊ या.' कर्नल घाईघाईत म्हणाले. ती कपडे करायला गेली त्याचवेळी जाडजूड शरीर सांभाळीत मीरपूरचे लखपती पायऱ्या उतरत होते.

'काय झालं बहादूर?'

'अरे, होणार काय? पोरी डोक्यावर चढल्या की जे होतं तेच झालं. इथून ती घरी जायला आठ वाजता निघाली म्हणे... अद्याप घरी नाही आली.'

'वाटेत कुठं अपघात वगैरे नाही ना झाला?'

'नाही... मी त्याच रस्त्यानं आलो ना?'

'तिच्या मैत्रिणींकडे पाहिलंस?'

'आता पाहतो. अंजलीला घेऊन जातो.' कर्नलसाहेब बरेच शांत झाले होते. चिडून आरडाओरडा करण्यात काही अर्थ नाही हे त्यांच्या लक्षात आले होते.

अंजलीसह ते गाडीत बसले तेव्हा आतून भडकून निघाले होते. वरकरशी शांत राहण्याचा प्रयत्न करीत होते. पाच वाजेपर्यंत ते अंजलीला आठवतील त्या तिच्या मैत्रिणींकडे गाडी घेऊन जात होते.

नंदिनी कुठेही आढळली नव्हती. आता अंजलीही घाबरली होती. पंडतच्या घरासमोर गाडी उभी राहिली तेव्हा पंडत दारात उभे होते... तेही काळजीत पडले होते. पोरगी नाहीशी झाली म्हणजे काय?

शिवाय, तो प्रतिष्ठेचा प्रश्न होता. उद्या गाव काय म्हणेल? कुणाचा तरी हात धरून गेली असेल पळून असे म्हणायला तिच्याच मैत्रिणी कमी करणार नव्हत्या.

प्रतिष्ठा गेली खड्ड्यात! कर्नलना आपली पोरगी हवी होती. त्यांचा जीव काळजीने वेडापिसा झाला होता.

ते कँपमध्ये परतले तेव्हा अंजलीही त्यांच्याबरोबर निघाली होती. नंदिनीच्या आईला फार मोठा धक्का बसेल... तिच्याकडे कुणीतरी थांबायला हवे असे तिला वाटत होते.



सकाळी सात वाजता कर्नलनी नंदिनीच्या फोटोसह लेखी तक्रार पोलीस स्टेशनात नोंदवली.

रविवार होता तो. प्रत्येक ऑफिसर येऊन विचारपूस करीत होता. काही बायका खूश होत्या. कित्येक ऑफिसर्स गाड्या घेऊन निघाले होते. ते गावात चौकशी करीत होते. स्कूटर तरी सापडायला हवी होती.

एक वाजता कर्नलना पोलीस स्टेशनवरून फोन आला. त्यांना ताबडतोब बोलावण्यात आले होते.

त्यांचा ऑर्डर्ली गाडीत पेट्रोल फुल्ल भरून गाडीजवळ उभा होता. कोणत्या क्षणी हुकूम होईल याची खात्री नव्हती. या पलीकडे आपण साहेबांसाठी काहीही करू शकणार नाही याची त्याला जाणीव होती.

साहेबांनी बसता बसताच सांगितले आणि पिसाटासारखी गाडी भरवेगाने शहरात घुसली. इन्स्पेक्टर त्यांचीच वाट पाहत होते.

इन्स्पेक्टरच्या सलामीचा स्वीकार करून कर्नल आत शिरले पण काहीच बोलले नाहीत. आपल्याला काय ऐकायला मिळेल याचीच चिंता त्यांच्या डोक्यात होती.

इन्स्पेक्टरच्या मागून ते चालत होते...

जेव्हा शीतगृहाच्या रोखाने इन्स्पेक्टर त्यांना नेऊ लागले तेव्हा त्यांच्या छातीत धस्स झाले.

'इन्स्पेक्टर' कर्नल त्यांचा हात घट्ट पकडीत म्हणाले, 'मला काय पाहावं लागणार आहे?'

'माफ करा सर, मी आधीच सांगायला हवं होतं, पण धीर झाला नाही.' इन्स्पेक्टर कसेबसे म्हणाले. कर्नलांचा हात थरथरत आहे याची त्यांना जाणीव झाली.

बहादुरसिंग एकाच जागी उभे होते. आत जाण्यासाठी त्यांना मनाची तयारी करायला हवी होती. कितीही झाले तरी ते सैन्यातील अधिकारी होते. एका इन्स्पेक्टरसमोर, पोलिसासमोर हतबल होणे, धीर सोडणे त्यांना शोभणार नव्हते. त्यांनी इन्स्पेक्टरचा हात सोडला नव्हता.

त्यांना कुणाचा तरी आधार हवा होता हाच त्याचा अर्थ होता. पाच मिनिटे ते एकाच अवस्थेत उभे होते. त्यांची समजूत कशी घालावी याचा विचार इन्स्पेक्टरना पडला होता. तेही गोंधळले होते.

‘इन्स्पेक्टर, चला’ कर्नल कठोर सुरात म्हणाले जे दिसेल ते शांतपणे पाहण्याची त्यांच्या मनाची तयारी झाली होती. शांतपणे ते चालले होते.

त्यांना पाहताच शीतगृहाचे दार उघडले गेले. आतून गार हवेचा एक भपकारा त्यांच्या अंगावर आला. दार उघडणारा पोलीस आत शिरला.

एका मेजावर पांढऱ्या कपड्यात झाकलेले एक प्रेत होते. नंदिनीचेच प्रेत होते ते. इन्स्पेक्टरनी शांतपणे चेहेऱ्यावरचे कापड काढले... कर्नलना आपला धीर सुटतो की काय असे क्षणभर वाटले. स्वतःला सावरणे त्यांना अतिशय कठीण गेले. अखेर त्यांनी स्वतःवर ताबा मिळवला होता.

हळूहळू त्यांनी पोटापर्यंतचा भाग उघडा केला होता. नंदिनीची सर्व छाती रक्ताने माखली होती. आणखी कोणतीही जखम तिच्या शरीरावर नव्हती.

‘इन्स्पेक्टर, पोस्टमार्टेम झाले की प्रेत मिलिटरी इस्पितळाच्या ताब्यात द्या’ कर्नल शांतपणे म्हणाले.

‘ठीक आहे सर.’

‘हा खुनाचा प्रकार आहे?’

‘होय सर, त्रिशुळासारख्या हत्याराने तो करण्यात आला. त्रिशुळाची तिन्ही टोके बरीच खोलवर गेलेली आहेत, असे डॉक्टरांचे मत आहे.’

‘खून झाला कुठं?’

‘कँपकडे जाणाऱ्या रस्त्यावर... धरणाकडे जो मातीचा रस्ता जातो तिथे.’

‘स्कूटर कुठं आहे?’

‘ती धरणाकडे सापडली. स्कूटर चांगल्या स्थितीत आहे. याचाच अर्थ त्याना कोणत्याही प्रकारचा अपघात झाला नव्हता. सर, मेमसाहेबांची समजूत घालणं कठीण आहे. त्यांना घेऊन येणार आहात का?’

‘नाही.’ कठोरपणे कर्नलसाहेब बोलले आणि गाडीत बसले. एव्हाना या खुनाची बातमी सर्वत्र पसरली होती.

‘सर, आम्हाला काही प्रश्न विचारायचे होते.’

‘आता थांबू?’

‘मेहेरबानी होईल सर. इतका भयंकर खुनी फासावर चढलाच पाहिजे.’ इन्स्पेक्टर त्वेषाने म्हणाले आणि कर्नलसाहेब खाली उतरले. दोघेही ऑफिसात येईतोपर्यंत चकार शब्द बोलले नव्हते.



‘इन्स्पेक्टर, माझी पोर वाह्यात होती. आमचा तिच्यावरचा ताबा सुटला होता. तिच्या मनाला येईल तसं ती वागत होती.’ कर्नलनी शांतपणे बोलायला सुरुवात केली. पोलिसांना काय हवे ते त्यांना माहीत होते.

‘ती न सांगता रात्री बारापर्यंतही घराबाहेर राहात होती. काल संध्याकाळी पाच वाजता ती स्कूटर घेऊन पंडतच्या घरी गेली. त्यांची मुलगी अंजली तिची खास मैत्रीण रात्री अडीच वाजता मी त्यांच्या घरी जाऊन चौकशी केली तेव्हा ती आठ वाजता घरी जायला निघाल्याचं समजलं. अंजलीला घेऊन पाच वाजेपर्यंत आम्ही तिचे इतर मित्र-मैत्रिणींकडे चौकशी करीत होतो. अखेर सकाळी साडेसातच्या दरम्यान तुमच्याकडे मी तक्रार नोंदवली.’

‘सर, जे विचारणार होतो तेच नेमकं सांगितलं. इतर प्रश्न मी त्यांच्या मित्रांना विचारीन... आपण जायला हरकत नाही.’ इन्स्पेक्टर नम्रतेने म्हणाले आणि महत्प्रयासाने घट्ट केलेले हृदय घेऊन कर्नलसाहेब गाडीत येऊन बसले.

✦✦✦